# हायवे रोड लगतची दुकाने फोडून चोरी करणाऱ्या टोळीस स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

फिर्यादी श्री संजय मोहनलाल मोटवानी, रा. कारंजा घाडगे यांचे कारंजा येथे बसस्टॉप जवळ हायवे लगत किराणा दुकान असून दि.२३-११-२०२१ रोजी रात्री ०१.४५ वा. चे सुमारास कोणीतरी अज्ञात चोरटयांनी त्यांच्या किराणा दुकानाचे शटर वाकवून दुकानात प्रवेश करून दुकानातून सिगारेटचे ७० पॉकेट, एक डी.व्ही.आर. मशीन व नगदी ४०००/- असा जु.की. २१,०००/- रू. चा माल चोरून नेल्याने पोलीस स्टेशन कारंजा येथे अप.क्र. ३७०/२०२१ कलम ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखे मार्फत सदर गुन्ह्याचा समांतर तपास सुरु असतांना गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी १) मोहम्मद आतीक मोहम्मद रफीक, वय २३ वर्षे, रा. मोमिनपुरा नागपूर, २) सक्षम प्रेमनाथ मोनदेकर, वय २० वर्ष, रा. गोळीबार चौक, नागपूर, ३) हिमांशू उर्फ गट्टू विश्वजीत नांदगावे, वय २४ वर्ष रा. मायानगर, इंदोरा, नागपुर, ४) शेख सोहेल उर्फ भांजा शेख मुखत्यार, रा. बडा ताजबाग नागपूर हे निष्पन्न करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन दिवस नागपुरात तळ ठोकून आरोपीतांची माहिती गोळा केली व मुखबीर कडून मिळालेल्या गुप्त माहितीवरून गोपनीयरित्या सापळा रचून आरोपी १) मोहम्मद आतीक मोहम्मद रफीक, वय २३ वर्षे, रा. मोमिनपुरा नागपूर, २) सक्षम प्रेमनाथ मोनदेकर, वय २० वर्ष, रा. गोळीबार चौक, नागपूर, ३) हिमांशू उर्फ गट्टू विश्वजीत नांदगावे, वय २४ वर्ष रा. मायानगर, इंदोरा, नागपुर ना मोमीनपुरा,नागपूर येथून अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले व त्यांचेकडून १) वेगवेगळया कंपनीचे सिगारेटची १६३ पॉकेट किंमत २०,१५३/- २) एक मोबाईल की. ५०००/- असा एकूण किंमत २५,१५३/- रू. चा माल जप्त करून गुन्हा उघडकीस आणला. यातील आरोपी हे अट्टल गुन्हेगार असून त्यांचे विरुद्ध नागपूर शहरातील विविध पोलीस स्टेशनला तसेच GRP नागपूर पो.स्टे. ला खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, चोरी या सदरा अंतर्गत गुन्हे नोंद आहेत.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. यशवंत सोळंके यांचे मार्गदर्शनात पो.नि. श्री. संजय गायकवाड, स्था.गु. शा. वर्धा, पो.नि. श्री राजपूत, पो.स्टे. कारंजा यांचे निर्देशाप्रमाणे पोउपनि. गोपाल ढोले, पोलीस अंमलदार अशोक साबळे, निरंजन वरभे, रणजित काकडे, हमीद शेख, चंदू बुरंगे, राजू तिवसकर, सायबर शाखेचे दिनेश बोथकर, अनुप कावळे यांनी केली.